मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३३०२१५४/४७०/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-३/४०७/२००७ दिनांक २८/०६/२००७
२. श्री पी बी जाधव, वरि सहा यांचा खुलासा दिनांक ११/७/२००७
३. इकडील आदेश क साप्रवि/अस्था३/६१९/२००७ दिनांक १७/०८/२००७
४. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्र.विशा-४/खाचौ/सी.आर/९०/२००७, दिनांक ०५/०२/२००८
५. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क साप्रवि/अस्था-३/२२१/२००८ दिनांक ३१/०३/२००८
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचे पत्र जा.क्र. २००/२००८ दिनांक ०३/०४/२००८
७. श्री.पी.बी. जाधव, वरिष्ठ सहाय्यक यांचा खुलासा दिनांक ०१/०४/२००८
८. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-अस्था/१-३/६९०/२००८ दिनांक १८/१०/२००८
९. मा अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडील अपिल क्र.५३/२०२२ निकाल दिनांक २०/१०/२०२२
१०.कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र. डिईएन-२०२३/प्र.क्र.१०९/आस्था-१२ दिनांक २९/०४/२०२६ समवेत म राज्यमंत्री यांचेकडील अपिल आदेश दिनांक २२/०४/२०२६

श्री प्रभाकर बाबुराव जाधव, हे वरिष्ठ सहाय्यक म्हणून पंचायत समिती अकोले, येथे कार्यरत असतांना त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ८ च्या आदेशान्वये श्री प्रभाकर बाबुराव जाधव, यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरिता बंद करण्याची शिक्षा करणेत आलेली होती.

श्री प्रभाकर बाबुराव जाधव, वरिष्ठ सहाय्यक, यांनी इकडील संदर्भ क्रमांक ८ च्या आदेशा विरुध्द मा .अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्र. ९ अन्वये श्री जाधव यांचे सदरचे अपिल विलंब माफीच्या मुद्यावर फेटाळण्यात आल्याने शिक्षेचे आदेश कायम राहिलेला आहे.

उक्त नमुद शिक्षेच्या आदेश व मा. अपर आयुक्ताचे निकालाचे अनुषंगाने श्री.जाधव यांनी मा. राज्यमंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी होवून संदर्भ क्र. १० चे पत्रान्वये मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दि २२ एप्रिल २०२६ या

..२

कार्यालयास दिनांक १२/०५/२०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देणेत आहेत.

१. अपिलार्थी श्री प्रभाकर बाबुराव जाधव यांचे अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे दिनांक २०/१०/२०२२ आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याचे दि १८/१०/२००८ रोजीचे आदेश व अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचा दि २०/१०/२०२२ रोजीच्या आदेशामध्ये अंशत: बदल करुन "दोन वेतनवाढी पुढील भविष्यकालीन वेतनवाढीवर कायम स्वरुपी परिणाम होईल अशा रितीने दोन वर्षाकरीता बंद करण्यात येत आहेत" या शिक्षेऐवजी "एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता एका वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपात रोखणे" अशी सुधारित शास्ती करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री प्रभाकर बाबुराव जाधव, तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक ..202606090601.1.1.. असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-06-2026 21:49:53

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. प्रभाकर बाबुराव जाधव, सेवा निवृत्त सहा प्रशा अधि, पशुसंवर्धन विभाग जि.प.अ.नगर
द्वारा व प्रत- उप आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

२/- सदरचा आदेश श्री.जाधव यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत /-
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर